| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./३२८७/२०२४** **दिनांक :- २८/०४/२०२४**

**प्रसिद्धिपत्रक**

दि.२९/०४/२०२४ व दि.३०/०४/२०२४ रोजी पुणे विद्यापीठ चौकामधील मेट्रोच्या गर्डर कास्टींगचे काम व स्टील गर्डर,कामासाठी औंध,बाणेर पाषाण रस्त्यावर वाहतूकीमध्ये प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात बदल करणे आवश्यक आहे सदर ठिकाणची वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहण्याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६ / ८७१ / सी. आर. - ३७ / टी. आर. ए. -२, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी रोहिदास पवार , पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, दि. २९/०४/२०२४ व दि. ३०/०४/२०२४ रोजी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी खालील प्रमाणे वाहतूकीमध्ये बदल करण्यात येत आहेत.

१. पाषाण रोड - पुणे विद्यापीठ चौक ते अभिमान श्री चौक दरम्यान रस्त्यावरुन दुहेरी वाहतूक करण्यात येत आहे.

२. बाणेर रोडवरुन पुणे विद्यापीठ चौकामध्ये प्रवेश बंद राहील
पर्यायी मार्ग - बाणेर रोडवरुन पुणे विद्यापीठ चौकमध्ये येणारे वाहनांनी अभिमान श्री चौक बाणेर रोड येथुन उजवीकडे वळण घेवुन अभिमान श्री चौक पाषाण रोडने विद्यापीठ चौकामध्ये यावे व इच्छित स्थळी जावे.

३. पुणे विद्यापीठ चौकामधुन औंध रोडने जाणारे वाहनांनी पुणे विद्यापीठ चौकामधुन औंध रोडने जावे.

वरील वाहतूकीमधील बदल हे दि. २९/०४/०२४ व दि. ३०/०४/२०२४ रोजी तापुरत्या स्वरुपात करण्यात आले आहेत.

Pawar

**( रोहिदास पवार )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**